महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/१८४५१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी
रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
**दिनांक : १२.०७.२०२२**

# परिपत्रक

**विषय - कोवीड - १९ विषाणूंचा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयांतील दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून देण्यात आलेली सूट बंद करणेबाबत.**

**संदर्भ -** १) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.०९/Covid-१९/११/११४७६ दि. १७.०६.२०२०.
२) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.०९/Covid-१९/१६५०० दि. ०८.१०.२०२०.
३) शासन परिपत्रक क्र. दिव्यांग-२०२१/प्र.क्र.३५ दि.क.२ दि. २४.०३.२०२२.

सन मार्च २०२० पासुन उदभलेला कोविड - १९ या महामारीचा प्रार्दुभाव व प्रसार रोखण्याकरीता महाराष्ट्र शासन यांच्याकडून कार्यलयीन उपस्थितीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांकरीता यापुर्वी लागु करण्यात आलेल्या आहेत. बंद (Lock Down) कालावधीमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद असल्याने दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थितीमध्ये सूट देण्याबाबतच्या सुचना शासना मार्फत निर्गमित करण्यात आलेल्या होत्या व सदर सुचना कंपनीचे संदर्भीय पत्र क्र. ०१ व ०२ अन्वये कंपनीतील कार्यरत दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थिती संदर्भात लागू करण्यात आलेल्या होत्या.

२. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे शासन परिपत्रक क्र. दिव्यांग-२०२१/प्र.क्र.३५ दि.क.२ दि. २४.०३.२०२२ अन्वये कोविड - १९ विषाणूंचा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयांतील दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून देण्यात आलेली सूट बंद करणेबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

३. शासन निर्णय दि. २४.०३.२०२२ च्या धर्तीवर अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन कंपनीतील कार्यरत दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना यापुर्वी कोविड - १९ विषाणूंचा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर कार्यालयात उपस्थित राहण्यापासून देण्यात आलेली सूट बंद करण्याबाबत मंजुरी प्रदान केलेली आहे.

४. तरी, सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, या परिपत्रकांन्वये कंपनीतील कार्यरत सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून देण्यात आलेली सूट बंद करण्यात आलेली आहे यांची नोंद घावी.

५. सदर परिपत्रक निर्गमित करण्यात आलेल्या दिनांका पासुन लागु राहील.

६. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(अ.म.भादीकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**
संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

७) मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

कोविड-१९ विषाणूंच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयांतील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून देण्यात आलेली सूट बंद करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**

**शासन परिपत्रक क्रमांक : दिव्यांग-२०२१ / प्र. क्र. ३५ / दि. क. २**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०००३२.

दिनांक : २४ मार्च, २०२२.

वाचा : १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : दिव्यांग-२०२० / अनौ.सं. ०७ / सा. प्र. वि. / दि. क. २, दिनांक २५ सप्टेंबर, २०२०,

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : दिव्यांग-२०२१ / प्र. क्र. ३५ / दि. क.-२, दिनांक ३ मे, २०२१.

**शासन परिपत्रक :**

राज्यातील कोविड-१९ विषाणूंच्या प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून घोषित केलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत दिनांक २५ सप्टेंबर, २०२० च्या परिपत्रकान्वये सार्वजनिक वाहतुकीची सुविधा सुरळीत होईपर्यंत तसेच दिनांक ३ मे, २०२१ च्या परिपत्रकान्वये दिव्यांग व्यक्तींची रोग प्रतिकारक शक्ती तितकीशी चांगली नसल्याने अडचणींचा सामना करणे कष्टप्रद व त्रासदायक होत असल्याची बाब विचारात घेता सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट देण्यात आली होती.

२. सद्यस्थितीत राज्यातील कोविड-१९ विषाणूंच्या प्रादुर्भाव कमी झाल्याने मंत्रालयीन विभाग तसेच विविध शासकीय कार्यालये पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेली आहेत. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही सुरळीतपणे सुरु झालेली आहे. सदर बाब विचारात घेता उक्त परिपत्रकान्वये दिव्यांग अधिकारी / कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून देण्यात आलेली सूट या आदेशाच्या दिनांकापासून बंद करण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२२०३२४१६४०५५४१२२ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2022.03.24 16:42:43 +05'30'

(वि. पुं. घोडके)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४) मा. विरोधी पक्षनेता विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७) सर्व सन्माननीय विधानपरिषद / विधानसभा सदस्य व संसद सदस्य,
८) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव /सचिव,
९) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
१०) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
११) मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,
१२) मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,
१३) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
१४) आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे,
१५) सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग,
१६) सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग,
१७) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
१८) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं. १, योगक्षेमसमोर, वसंतराव नाईक चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई ४०० ०२१,
१९) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश, कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२५,
२०) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई ४०००२१,
२१) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ०२८,
२२) बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३,
२३) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०० ०१३,
२४) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०० ०१३,
२५) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४७०० ०२८,
२६) निवड नस्ती /दि.क.२.